सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

**( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )**

क्र. DGP- D८A०१७/१/२०२५ DESK ८ A　　　　मुंबई, दिनांक : २२/५/२०२५

**वाचा :-**　महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५.

**-: आदेश :-**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मुफसल लिपीक संवर्गातील खालील नमूद कार्यालय अधीक्षक यांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये त्यांच्या विनंतीवरुन बदली करण्यात येत आहे :-

| अ.क्र | कार्यालय अधीक्षकाचे नाव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | बदलीवरील नवीन नेमणूकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती वनिता गणेश नायकवाडी | समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १०, सोलापूर | समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १, पुणे |
| २. | श्री. मनेष कृष्णाजी चांदगुडे | समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ३, जालना | विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर |

२.　वर नमुद कार्यालय अधीक्षक यांच्या बदल्या त्यांच्या विनंतीवरुन करण्यात आलेल्या असल्याने त्यांना पदग्रहण अवधी व प्रवास भत्ता देय राहणार नाही.

३.　वर नमुद कार्यालय अधीक्षक यांच्या विनंती बदलीचा विचार करताना अडचणी, रिक्त पदे व प्रशासकिय बाबी विचारात घेऊन बदली करण्यात आली आहे.

४.　बदलीच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरिता खालील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

i. उपरोक्त प्रमाणे बदली झालेल्या कार्यालय अधीक्षक यांनी त्यांच्याकडील प्रलंबित संदर्भ व प्रतिक्षाधीन प्रकरणांची यादी पदमोचक कार्यालय अधीक्षक किंवा संबंधित कार्यालय प्रमुख यांच्याकडे न चुकता द्यावी. त्याशिवाय बदलीवर कार्यमुक्त होता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

ii. बदली झालेल्या कार्यालय अधीक्षक यांना बदलून जाणाऱ्या संबंधित घटक प्रमुखांनी विनाविलंब बदलीवर कार्यमुक्त करुन कार्यमुक्त केल्याबाबतचा दिनांक या कार्यालयास कळवावा तसेच, बदलीवर येणाऱ्या संबंधित घटक प्रमुखांनी त्यांना तात्काळ रुजू करुन हजर झाल्याबाबतचा दिनांक या कार्यालयास कळवावा.

**रश्मी शुक्ला**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१, पुणे / गट क्र.३, जालना / गट क्र.१०, सोलापूर

**(कृष्ण प्रकाश)**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)(अति.कार्य.)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, सायबर, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १० /१२ /३६.
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई
२/- यांनी सदरचे आदेश पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर १ महिन्यासाठी प्रसिध्द करण्यात यावेत.